निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २१४ वा.
मंगळवार -०७ ऑक्टोबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या नगराध्यक्षपदांची आरक्षण सोडत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या नगराध्यक्षपदांची आरक्षण सोडत नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत पार पडली.यावेळी नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, उपसचिव प्रियांका कुलकर्णी, छापवाले, उपसचिव विद्या हम्पय्या, अनिरुद्ध जेवळीकर, यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.राज्यातील २४७ नगरपरिषदेपैकी ३३ पदे अनुसूचित जातींसाठी व ११ पदे अनुसूचित जमातीसाठी आणि ६७ पदे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहेत. तर १३६ पदे खुल्या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

नगरपरिषद आरक्षण पुढील प्रमाणे :

**नगरपरिषदांमधील अनुसूचित जातीसाठी आरक्षित पदे (३३ पदे)**

**अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षित नगरपरिषदा (१७ पदे)**

देऊळगाव राजा, २. मोहोळ, ३. तेल्हारा, ४. ओझर, ५. वाना डोंगरी (नागपूर), ६. भुसावळ, ७. घुग्घुस, ८. चिमूर, ९. शिर्डी, १०. सावदा, ११. मैंदर्गी, १२. डिगडोह(देवी), १३. दिग्रस (यवतमाळ), १४. अकलूज, १५. परतूर, १६. बीड, १७. शिरोळ

**अनुसूचित जाती प्रवर्गासाठी (सर्वसाधारण) आरक्षित नगरपरिषदा (१६ पदे)**

पाचगणी, २. हुपरी, ३. कळमेश्वर, ४. फुरसुंगी ऊरुळी-देवाची, ५. शेगांव, ६. लोणावळा, ७. बुटीबोरी, ८. आरमोरी, ९. मलकापूर, जि.सातारा, १०. नागभिड, ११. चांदवड, १२. अंजनगांवसूर्जी, १३. आर्णी, १४. सेलू, १५. गडहिंग्लज, १६. जळगांव-जामोद,

**अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी आरक्षित नगरपरिषदा**

अनुसूचित जमातीसाठी एकूण ११ पदांपैकी ६ पदे महिलांसाठी आरक्षित आहेत.

**अनुसूचित जमाती महिलांसाठी आरक्षित (६ पदे)**

पिंपळनेर, २. शेंदूरजनाघाट, ३. भडगांव, ४. यवतमाळ, ५. उमरी, ६. वणी

**अनुसूचित जमाती सर्वसाधारण प्रवर्ग (५ पदे)**

पिंपळगांव-बसवंत, २. राहुरी, ३. एरंडोल, ४. अमळनेर, ५. वरुड

**नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी नगरपरिषदा :-**

एकूण २४७ नगरपरिषदांमधून ६७ पदे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित




ठेवण्यात आली आहेत.

नागरिकांचा मागास प्रवर्गातील (सर्वसाधारण) आरक्षित पदे (३३ पदे)

तिरोडा, २. वाशिम, ३. भद्रावती, ४. परांडा, ५. नंदुरबार, ६. खापा, ७. शहादा, ८. नवापूर, ९.त्र्यंबक, १०. कोपरगांव, ११. मंगरुळपीर, १२. कन्हान-पिंपरी, १३. पाथर्डी, १४. रामटेक, १५, नशिराबाद, १६.पालघर, १७. वरणगांव, १८. मलकापूर, जि.बुलडाणा, १९. इस्लामपूर, २०. मोहपा, २१. तुमसर, २२. महाड, २३. राहता, २४. श्रीवर्धन, २५. ब्रम्हपूरी, २६. दर्यापूर, २७. वैजापूर, २८. गोंदिया, २९. सांगोला, ३०. वर्धा, ३१. येवला, ३२. कंधार, ३३. शिरपूर-वरवाडे.

**नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसाठी राखीव पदे (३४ पदे)**

धामणगांव रेल्वे, २. भोकरदन, ३. भगूर , ४. मालवण , ५. वरोरा , ६. हिंगोली , ७. मोर्शी , ८. उमरेड , ९. हिवरखेड , १०. बाळापूर , ११. शिरुर , १२. कुळगांव-बदलापूर , १३. देगलूर , १४. नेर-नबाबपूर , १५. धाराशिव , १६. इगतपूरी , १७. माजलगांव , १८. मुल , १९. बल्लारपूर , २०. जुन्नर , २१. कुर्डूवाडी , २२. औसा , २३. मुरुड-जंजिरा , २४. अकोट , २५. विटा , २६. चोपडा , २७. सटाणा , २८. काटोल , २९. दौंड , ३०. रोहा , ३१. देसाईगंज , ३२. पुलगांव , ३३. कर्जत, जि.रायगड , ३४. दोंडाईचा-वरवाडे.

खुल्या प्रवर्गातील नगरपरिषदांचे आरक्षण

एकूण २४७ पैकी १३६ पदे ही खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित असून यापैकी ६८ पदे ही महिलांसाठी राखीव आहेत.

**खुला प्रवर्ग (सर्वसाधारण)**

१ फलटण, २ अहमदपूर, ३ पाथरी, ४ चाळीसगांव, ५ तळोदा, ६ वाई, ७ नांदगांव, ८ जयसिंगपूर, ९निलंगा, १० लोहा, ११ खोपोली, १२राजगुरूनगर १३ कराड, १४जेजुरी, १५ उमरगा, १६आळंदी, १७ पुसद, १८ बारामती १९ जत, २०. पारोळा, २१तळेगांव-दाभाडे, २२सासवड, २३ गडचांदुर, २४ रिसोड, २५ वेंगुर्ला, २६ पातूर, २७ किल्लेधारुर, २८ चिखली, २९ मेहकर, ३० दारव्हा, ३१ सिल्लोड, ३२ सिन्नर, ३३ देवळी, ३४ मुरूम, ३५ वडगांव, ३६ महाबळेश्वर, ३७ आष्टा, ३८ दुधणी, ३९ कुंडलवाडी, ४० खुलताबाद, ४१नरखेड, ४२ राजूरा, ४३ सिंदखेडराजा, ४४ वाडी, ४५ डहाणू, ४६ देवळाली-प्रवरा, ४७ कामठी, ४८ अक्कलकोट, ४९ सातारा, ५० भोर, ५१ इंदापूर, ५२ चिपळून, ५३ माथेरान, ५४ श्रीगोंदा, ५५ श्रीरामपूर, ५६ मनमाड, ५७ नळदुर्ग, ५८ भोकर, ५९ बिलोली, ६० अंबेजोगाई, ६१ जिंतूर, ६२ सोनपेठ, ६३ गंगापूर, ६४ पांढरकवडा, ६५ घाटंजी, ६६ मुर्तीजापूर, ६७ चिखलदरा, ६८ तुळजापूर.

**खुला प्रवर्गातली महिलांसाठी नगरपरिषदा**

परळी-वैजनाथ, २. मुखेड, ३. अंबरनाथ, ४. अचलपूर ,५. मुदखेड ६. पवणी ७. कन्नड , ८. मलकापूर, जि.कोल्हापूर , ९. मोवाड , १०. पंढरपूर, ११. खामगांव , १२. गंगाखेड , १३. धरणगांव , १४ बार्शी, १५. अंबड, १६. गेवराई, १७. म्हसवड, १८. गडचिरोली, १९.भंडारा, २०. उरण , २१. बुलडाणा , २२. पैठण , २३. कारंजा , २४. नांदुरा, २५. सावनेर, २६. मंगळवेढा , २७. कळमनूरी , २८. आर्वी, २९. किनवट, ३०. कागल , ३१. संगमनेर, ३२ मुरगुड, ३३ साकोली, ३४ कुरुंदवाड , ३५ पुर्णा, ३६ कळंब , ३७ चांदुररेल्वे , ३८ चांदुरबाजार, ३९ भुम , ४० रत्नागिरी , ४१ रहिमतपूर, ४२ खेड, ४३ करमाळा , ४४ वसमत, ४५ हिंगणघाट , ४६ रावेर, ४७ जामनेर, ४८ पलुस, ४९ यावल , ५० सावंतवाडी, ५१ जव्हार, ५२ तासगांव , ५३ राजापूर , ५४ सिंधरेल्वे , ५५ जामखेड , ५६ चाकण , ५७ शेवगांव, ५८ लोणार, ५९ हदगांव, ६० पन्हाळा, ६१ धर्माबाद, ६२ उमरखेड, ६३ मानवत, ६४ पाचोरा , ६५ पेण , ६६ फैजपूर, ६७ उदगीर, ६८ अलीबाग.

नगरपंचायतीचे आरक्षण

राज्यातील १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदांचे आरक्षण आज काढण्यात आले. यामध्ये अनुसूचित जातीसाठी एकूण १८ जागा आरक्षित असून यामध्ये महिलांसाठी ९ व सर्वसाधारण साठी ९ पदे आरक्षित आहेत. तर अनुसूचित जमातीसाठी १३ जागा असून त्यामध्ये ७ जागा महिलांसाठी व ६ जागा सर्वसाधारण गटासाठी आहेत. तर नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी एकूण ४० पदे आरक्षित असून त्यामध्ये २० जागा महिलांसाठी व २० जागा सर्वसाधारण गटासाठी आहेत. खुल्या प्रवर्गासाठी एकूण ७६ जागा असून ३८ जागा महिलांसाठी व ३८ जागा या सर्वसाधारण गटासाठी आरक्षित आहेत.

अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीव

**महिलांसाठी आरक्षित नगरपंचायती (९ पदे)**

१ .निलडोह, २. गोधनी(रेल्वे), ३. कोरची, ४. बहादुरा , ५. धानोरा, ६. गौंडपिंपरी, ७. ढाणकी , ८. अहेरी , ९. बेसा-पिपळा

**अनुसूचित जाती प्रवर्ग (सर्वसाधारण)**

येरखेडा, कांद्री (कन्हान), भिसी, कुरखेडा, देवरी, माळेगांव(ब्रु.), बिडगांव-तरोडी (खुर्द)-पांढुर्णा, भातकुली, दहीवडी.

अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी राखीव:-

**महिलांसाठी आरक्षित नगर पंचायती (७ पदे)**

भिवापूर, अर्जुनी-मोरगांव, सिरोंचा , हिंगणा, समुद्रपूर, पाली, देवळा.

**अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) (६ पदे)**

कोरपणा, कळंब, माणगांव, गोरेगांव, सेलू , सिंदेवाही

**नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी राखीव (४० पदे सर्वसाधारण गटासाठी आरक्षित (२० पदे)**

पारनेर, तळा, खानापूर, पालम, मंठा, कोंढाळी, माळशिरस , एटापल्ली, झरी-जामणी, पोंभूर्णा , माहूर, आटपाडी, मालेगांव-जहांगिर, तिर्थपूरी, कणकवली, शिरुर-कासार, विक्रमगड, अकोले , मोखाडा, सुरगणा.

**नागरिकांचा मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित (२० पदे)**

घनसावंगी, भामरागड, मंचर, पाटोदा, माढा, कळवण, सावली, मानोरा, मारेगांव, आष्टी, जि. वर्धा, तलासरी, वडवणी, पोलादपूर, खालापूर, शिरुर-अनंतपाळ, जाफ्राबाद, चाकूर, आष्टी, जि.बीड, जिवती, कर्जत, जि.अहिल्यानगर.

**खुल्या प्रवर्गासाठी नगर पंचायती (एकूण ७६ पदे)**

**खुला (सर्वसाधारण) (३८ पदे)**

शेंदूर्णी , साक्री, सालेकसा, कवठे-महांकाळ, देवणी, मोताळा, अर्धापूर, बोदवड, हिमायतनगर, कसई-दोडामार्ग, मुलचेरा, धडगांव-वडफळ्या, कुडाळ, कोरेगांव, दापोली, वाभवे-वैभववाडी, निफाड, चंदगड, चार्मोर्शी, बदनापूर, कारंजा, धारणी, फुलंब्री, हातकणंगले, लोहारा (ब्रु.), मुरबाड, केज, आजरा, संग्रामपूर, खंडाळा, वडूज, देवगड-जमसंडे, नेवासा, मौदा, शिराळा (जि. सांगली), नायगाव, सेनगाव, महागाव.

**खुला प्रवर्गातील महिलांसाठी (पदे ३८)**

बाभुळगांव, २. मुक्ताईनगर, ३. कुही, ४. देहू, ५. शहापूर, ६. पारशिवनी, ७. वडगांव-मावळ, ८. तिवसा, ९. मंडणगड, १०. शिंदखेडा, ११. लांजा, १२. देवरुख, १३. वाडा, १४. लोणंद, १५. मेढा, १६. जळकोट, १७. दिंडोरी, १८. सडक-अर्जुनी, १९. म्हसळा, २०. नातेपुते, २१. रेणापूर, २२. लाखणी, २३. औंढा-नागनाथ, २४. पाटण, २५. पेठ, २६. कडेगांव, २७. अनगर, २८. महादूला, २९. सोयगांव, ३०. वैराग, ३१. लाखांदूर, ३२. राळेगांव, ३३. गुहागर, ३४. नांदगांव-खडेश्वर, ३५. महाळुंग-श्रीपूर, ३६. वाशी, जि.धाराशिव, ३७. बार्शी-टाकळी, ३८. मोहाडी.

राज्यातील नगरपरिषदा व नगर पंचायतीच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली, असे सांगून महिला प्रवर्गासाठी आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या भगिनींना तसेच या निवडणुकीसाठी सर्वांना नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी शुभेच्छा दिल्या.

# संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त कन्नड नगरीत स्वयंसेवकांचे भव्य पथसंचलन






**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /उदय कुलकर्णी** / विजयादशमीच्या दिवशी देश हितासाठी स्थापन झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघास आज १०० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून कन्नड नगरीतील स्थापित संघ शाखेच्या वतीने दि.५ ऑक्टोंबर रोजी पथसंचलणाचे आयोजन करण्यात आले होते.

या आयोजीत पथसंचलणाची सुरवात शहरातील माळीवाडा परिसरातील प्रशिद्ध हनुमान मंदिर येथून दुपारी ठीक ३:३० वाजता करण्यात आले.तेथून शहर पोलीस दल कार्यालय,तहसील,आण्णाभाऊ साठे चौक,लो.टिळक चौक,ग्रामीण पो. दल कार्यालय,पिशोर नाका,पुढे हिवरखेडा रोड,शर्मा हॉटेल.दत्तनगर,कॉलेज गेट परिसर मार्गे शहरातील प्रसिद्ध श्री.दत्तात्रय मंदिर परिसराचे मैदानात या संचलणाचा समारोप करण्यात आला.या पार पडलेल्या संचलयात सहभागी झालेल्या स्वयंसेवकांनी पारंपारिक रित्या गणवेश धारण करून शिस्तबद्धरित्या भारत मातेच्या जयघोषात हिंदू एकात्मता,देशरक्षण,व सर्व समाज एकात्मता कार्याचे शहरवासियांना दर्शन घडविले.या निघालेल्या पतसंचलन मार्गावरील पिशोर नाकास्तीत कन्नड सोयगाव विधानसभेच्या आमदार सौ संजनाताई जाधव, शिवसेनेचे शहराध्यक्ष डॉ.सदाशिव पाटील,व इतर पदाधिकारी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक व्यापारी, युवा मंच पदाधिकारी यांनी या पथसंचलयात सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवकांवर पुष्पवृष्टीचा वर्षाव केला,शेवटी समारोप वेळी संघ शाखेच्या प्रमुखांकरवी शताब्दी वर्षानिमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहीती देण्यात आली. शेवटी शास्त्र पूजन, करण्यात आले. सुभाषित, अमृतवाचन, संघिक पद्द, व बौद्धिक सादरीकरणाचे कार्यक्रमाही मोठ्या उत्साहात पार पडले , या निघालेल्या भव्य दिव्य पतसंचलयात अनेकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविला, या पथसंचलन मार्गावर शहर पोलीस दलाचे पोलीस निरीक्षक रघुनाथ सानप यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलीस दलाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चांद मेंडके यांचे नेतृत्वात पोलीस दलाचे प्रदीप चव्हाण विजय चौधरी, नामदेव दौंडकर, सतीश नरवडे, सुभाष पवार व इतर सहकाऱ्यांनी कडे कोट बंदोबस्त तैनात केला होता.

# कुंभार पिंपळगांव परिसरात १०० कोटीपेक्षा जास्त बेकायदेशीर प्लॉटिंग !

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/विशेष प्रतिनिधी** / घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगांव येथे शासनाचे सर्व नियम कायदे धाब्यावर बसवून कोट्यावधी रूपयांची बेकायदेशीर प्लॉटिंग काढून प्लॉट विक्री केले जात आहेत. आश्चर्य म्हणजे सदरील बेकायदशीर प्लॉटिंगचा आकडा हा १०० कोटींच्या वर असल्याचे दिसत आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की, घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगांव हे जवळपास २० हजार लोकसंख्येचे गांव आहे, येथे मोठी व्यापारीपेठ आहे, शिवाय हे गांव २५ ते ३० गावाचा केंद्रबिंदू आहे. गावातून २ महामार्ग गेले आहेत. गावाचा चारही बाजूने झपाट्याने विस्तार होत असतांनाच येथे बेकायदेशीर प्लॉटिंगलाही ऊत आले आहे. कुंभार पिंपळगांव व परिसरात जवळपास २५ ते ३० ठिकाणी बेकायदेशीर प्लॉटिंग काढण्यात आली आहे. गंभीर बाब म्हणजे अपवाद सोडल्यास कोणीही एन.ए. केलेले नाही अथवा शासनाची परवानगी घेतलेली नाही. सदरील प्लॉटिंगचा आकडा हा १०० कोटींच्या वर असल्याचे दिसत आहे.

**जालना घनसावंगी महसूल प्रशासन कुंभकर्ण झोपेचे घेत आहे सोंग..**

**चारही दिशेला प्लॉटिंग !**

कुंभार पिंपळगांव व गावालगत कोट्यावधी रूपयांची बेकायदेशीर प्लॉटिंग झाली असून अजूनही सातत्याने प्लॉटिंग सुरूच आहे. गावातून पाचोड-अंबड-घनसावंगी-कुंभार पिंपळगांव-आष्टी हा एक महामार्ग गेलेला आहे तर रांजणी ते कुंभार पिंपळगांव - उक्कडगांव हा दुसरा महामार्ग गेलेला आहे, शिवाय गावातूनच इतर अनेक गावांना सुध्दा छोटे मोठे रस्ते गेलेले आहेत, या प्रत्येक रस्त्यावर नियम कायदे धाब्यावर बसवून २५ ते ३० ठिकाणी कोट्यावधीची बेकायदेशीर प्लॉटिंग काढण्यात आली आहे.

**नियम काय ?**

जो पर्यंत एन.ए. काढण्यात येत नाही किंवा शासनाच्या विविध परवानग्या घेतल्या जात नाही, तो पर्यंत प्लॉटिंग काढताच येत नाही. हे अधिकारी सुध्दा मान्य करतात. मात्र कुंभार पिंपळगांवात सर्व नियम कायदे धाब्यावर बसवून कोणीही सहज जमिन खरेदी करत आहे आणि उभ्या आडव्या रेषा मारून बेकायदेशीरपणे प्लॉट विक्री करत आहे.

**कोट्यावधीची उलाढाल !**

कुंभार पिंपळगावात आणि गावाच्या बाहेरील एकही रस्ता सुटलेला नाही जेथे बेकायदेशीर प्लॉटिंग काढण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्लॉटिंग काढणारे ठिकठिकाणी जमिनी खरेदी करत असल्याने त्यांच्याकडे एवढा पैसा येतोय कुठून ? ब्लॅक मनीचा वापर होत आहे का ? आणि या प्लॉटिंगला फायनान्सर कोण ? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

**ग्रामसेवकाचा आशीर्वाद !**

सदरील बेकायदेशीर प्लॉटिंगला नुकतंच शेतकरी अनुदान घोटाळ्यात निलंबित झालेले कुंभार पिंपळगांवचे ग्रामसेवक (ग्रा.पं.अधिकारी) यांचा विशेष आशीर्वाद लाभला आहे. कारण सर्वात आधी नियमबाह्य प्लॉटिंगच्या प्लॉटची बेकायदेशीर नोंद ग्रामपंचायतला केली जाते. त्यानंतर हे प्लॉट रजिस्ट्री ऑफीस मध्ये चहापानी करून नोंद केले जातात. कारण ग्रामपंचायतला नोंद केल्यानंतरच रजिस्ट्रीची प्रक्रिया पुढे राबवली जाते. म्हणजे सुरूवात ग्रामपंचायत पासूनच होते.

**रजिस्ट्री ऑफीसची भूमिका संशयास्पद !**

सदरील बेकायदेशीर प्लॉटिंगवाले ग्रामपंचायत स्तरावर प्लॉटची नोंद केल्यावर रजिस्ट्री ऑफीस (दुय्यम निबंधक कार्यालय) येथे प्लॉटची रजिस्टी करून देत आहेत. रजिस्ट्री ऑफीसला साधारणपणे कोणीही विचारणा केल्यास रजिस्ट्री बंर्याच दिवसापासून बंद असल्याचे सांगितले जाते, परंतू अंधारातून घेणं-देणं करून कार्यक्रम फत्ते केला जात आहे. विशेष म्हणजे अनेकदा संबंधित अधिकारी २ / ४ दिवस सुट्टीवर गेल्यावर त्या काळात मोठ्या प्रमाणात रजिस्ट्री होत असल्याचे सुत्रांनी सांगितले.

**प्रशासन चौकशी करणार का ?**

**कुंभार पिंपळगाव व परिसरात जवळपास १०० कोटीची बेकायदेशीर प्लॉटिंग काढण्यात आलेली आहे. या बेकायदेशीर प्लॉटिंगची जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुद्रांक जिल्हाधिकारी, बीडीओ चौकशी करणार का ? दोषींवर कारवाई करणार का ? असा सवाल जनतेतून विचारला जात आहे.**

# कपिलधारवाडीत जमीन खचली; तातडीने सर्वेक्षण करा-खा.बजरंग सोनवणे



**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/ प्रतिनिधी/** बीड तालुक्यातील पाली ग्रामपंचायत हद्दीतील कपिलधारवाडी परिसरात निर्माण झालेल्या जमिनीतील भेगा व जमीन खचणे या गंभीर भूगर्भीय परिस्थितीवर तातडीने वैज्ञानिक भूगर्भ सर्वेक्षण करण्यात यावे, असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी महानिदेशक, भारतीय भूगर्भ सर्वेक्षण (GSI), भारत सरकार, नवी दिल्ली यांना दिले आहे.खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, कपिलधारवाडी गाव व त्याच्या परिसरात (पाली ग्रामपंचायत) गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गंभीर भूगर्भीय स्थिती निर्माण झालेली आहे, या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. अलीकडच्या काही दिवसांत या परिसरात जमिनीत मोठ्या भेगा पडल्याचे दिसून आले असून त्या झपाट्याने वाढत आहेत. अनेक ठिकाणी जमीन खचल्याचेही स्पष्ट दिसते. त्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतजमिनी, घरं, सार्वजनिक रस्ते इत्यादींना संभाव्य धोका निर्माण झाला आहे. या घडामोडींच्या स्वरूपावरून हे स्पष्ट होते की या भागात अनपेक्षित व धोकादायक भूगर्भीय बदल होत आहेत. या परिस्थितीच्या गांभीर्याचा तातडीने विचार करून भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाने (GSI) केंद्रातील तज्ञांची टीम तातडीने पाठवून कपिलधारवाडी परिसर व आजूबाजूच्या भागाचा सखोल भूगर्भीय व भू-तांत्रिक सर्वेक्षण करावे. या सर्वेक्षणाद्वारे भूस्खलन व भेगा पडण्यामागील शास्त्रीय कारणे शोधावीत व तात्काळ प्रतिबंधक व सुधारात्मक उपाय सुचवावेत.

# मतदारयादीचं शुद्धीकरण

बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित आणि मतदारयादी सुधारणा कार्यक्रमामुळे निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केलेल्या केंद्रीय निवडणूक आयोगाने आज बिहार निवडणूक कार्यक्रम घोषित केला. बिहारमध्ये दोन टप्प्यात मतदान होणार असून १४ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होईल. पहिल्या टप्प्याचे मतदान ६ नोव्हेंबर रोजी, तर दुसऱ्या टप्प्यातील मतदान ११ नोव्हेंबर रोजी होईल.मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले, सत्य हे आहे की लोकांनी सोशल मीडियावर एसआयआरबद्दल खूप टिप्पण्या केल्या आहेत. परंतु सत्य हे आहे की राजकीय पक्षांनी एसआयआरची मागणी केली आहे. निवडणूक आयोग ज्या मतदारांचे पत्ते बदलले आहेत त्यांना नवीन मतदार कार्ड जारी करेल. निवडणुकीच्या १० दिवस आधीपर्यंत नावे जोडता येतील. ३० सप्टेंबर रोजी अंतिम यादी जाहीर करण्यात आली. निवडणुकीदरम्यान कायदा आणि सुव्यवस्थेवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल.निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार म्हणाले, यावेळी बिहारच्या निवडणुका सुरळीत आणि सोप्या पद्धतीने होतील. निवडणुकीसाठी आम्ही बिहारच्या जनतेचे सहकार्य मागतो. बिहारमध्ये एकूण ७.४२ कोटी मतदार आहेत, त्यापैकी ३.९२ कोटी पुरुष आहेत आणि ३.५ कोटी महिला आहेत. १४ लाख मतदार पहिल्यांदाच मतदान करतील. प्रत्येक मतदान केंद्रावर १२०० मतदार असतील.बिहारच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी एसआयआरबाबत सांगितले की, मतदार यादी दुरुस्त करण्यात आली आहे. निवडणूक आयोग ही एक संवैधानिक संस्था आहे. अंतिम मतदार यादी सर्व राजकीय पक्षांना वितरित करण्यात आली आहे. जर अजूनही काही समस्या असतील तर ते अर्ज करू शकतात.दुसरीकडे, २०२० मध्ये बिहारच्या निवडणुका तीन टप्प्यात झाल्या. २० ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर या कालावधीत मतदान झाले. निकाल १० नोव्हेंबर रोजी जाहीर करण्यात आले. यापूर्वी २०१५ मध्ये पाच टप्प्यात मतदान झाले होते. १२ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत मतदान झाले. निवडणुकीचे निकाल ८ नोव्हेंबर रोजी जाहीर झाले. बिहार विधानसभा निवडणूक २०२० ही भारतीय राजकारणात फार महत्वाची ठरली. या निवडणुकीत राष्ट्रीय जनता दल (राजद) तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखाली प्रबळ आव्हान घेऊन उतरला. तर दुसरीकडे जनता दल (युनायटेड) चे नितीशकुमार आणि भारतीय जनता पक्ष (भाजप) यांनी महायुती करून निवडणूक लढवली. निकाल लागला तेव्हा राज्यातील जनतेने बदलाची लाट निर्माण केली असली, तरी अंतिम आकडेवारीत महायुतीने केवळ १५-२० जागांच्या फरकाने सत्ता काबीज केली.या निवडणुकीतील खरा किंगमेकर ठरला तो छोट्या पक्षांचा आकडा. विशेषतः एआयएमआयएम आणि चिराग पासवान यांच्या लोजपाने (LJP) निवडणुकीत थेट सत्ता काबीज केली नसली तरी राजकीय समीकरण ढवळून काढलं. चिराग पासवान यांनी जेडीयूविरोधी भूमिका घेत भाजपच्या उमेदवारांना अप्रत्यक्ष मदत केली. त्यामुळे नितीशकुमार यांच्या पक्षाला फटका बसला, पण त्याचवेळी भाजपला फायदा झाला. परिणामी, महायुतीत भाजप हा मोठा पक्ष बनला आणि नितीशकुमार यांची ताकद कमी झाली. राजदने सर्वाधिक जागा जिंकूनही (७५+), सत्ता त्यांच्या हातून निसटली. यामध्येच नितीशकुमार यांनी पुन्हा एकदा आपली राजकीय कला दाखवली. लोकांचा कडवा विरोध असूनही नितीश यांनी भाजपसोबत राहून मुख्यमंत्रीपद टिकवले. त्यांचा हा निर्णय राजदसाठी मोठा धक्का होता, कारण जनमताने त्यांना पहिली पसंती दिली होती, पण सत्ता समीकरणात आकड्यांचा खेळ महत्त्वाचा ठरला.

# भारतीय महिला संघाला विश्वविजयासाठी शुभेच्छा !

भारतीय पुरुषांच्या क्रिकेट संघाने दुबईत झालेल्या आशिया चषक स्पर्धेत अजिंक्यपद मिळवले. अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा धुव्वा उडवत हे अजिंक्यपद मिळवले. या विजयानंतर संपूर्ण देशात दिवाळी साजरी करण्यात आली. अजिंक्यपद मिळवूनही भारतीय संघाने पाकिस्तानच्या नक्वी यांच्याकडून चषक न स्वीकारण्याच्या निर्णय घेतल्याने मोठा वादंग झाला. हा वादंग अजूनही चालू आहे. भारताला सन्मानपूर्वक चषक प्रदान केला जाईल की नाही याकडे संपूर्ण देशाचे आणि मीडियाचे लक्ष लागले असतानाच भारतीय महिला क्रिकेटचा संघ ५० षटकांच्या म्हणजेच एकदिवसीय विश्वचषक खेळतोय आणि हा विश्वचषक भारतात होतोय हे माहीत असणाऱ्या लोकांची संख्या खूप कमी आहे आणि ते साहजिकच आहे कारण आपल्या देशात पुरुषांच्या क्रिकेट संघावर जीव ओवाळून टाकणारे जितके लोक आहेत त्याचा दहा टक्के लोक देखील महिला क्रिकेट पाहत नाही. महिला क्रिकेटला भारतात कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही आता हा विश्वचषक भारतात असल्याने स्टार स्पोर्ट वाहिनीवर त्याचे थेट प्रेक्षपण चालू आहे पण सामना पाहणाऱ्यांची सख्या कमी आहे. मैदानावर देखील प्रेक्षकांची उपस्थिती कमीच असते. महिला क्रिकेट संघाला प्रयोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात. आता हेच पहा ना पुरुषांचा संघ ऑस्ट्रेलियात एकदिवसीय आणि टी २० मालिका खेळण्यासाठी जाणार आहे. या मालिकेत भारत कशी कामगिरी करतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे मात्र भारतात महिलांचा ५० षटकांचा विश्वचषक चालू आहे त्याची मात्र कोठेच चर्चा नाही. याच विश्वचषक स्पर्धेत रविवारी भारतीय महिलांनी पाकिस्तानी महिलांचा ८८ धावांनी धुव्वा उडवला. भारतीय संघाने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा एकतर्फी पराभव करूनही महिला संघाचे कौतुक करण्यासाठी कोणी पुढे आले नाही. हेच जर पुरुषांच्या संघाने केले असते तर देशभर दिवाळी साजरी झाली असती. रस्त्यारस्त्यात लोकांनी तिरंगा हातून घेऊन विजयी यात्रा काढल्या असत्या. टीव्ही चॅनलने खेळाडूंच्या कौतुकाच्या २४ तास बातम्या दाखवल्या असत्या. वर्तमानपत्रात भारतीय खेळाडूंच्या कौतुकाचे मथळे छापून आले असते. राष्ट्रपती, पंतप्रधानांपासून सर्वांनीच भारतीय संघाचे अभिनंदन केले असते. सोशल मीडियावर संघाच्या कौतुकाचा महापूर आला असता. सर्वांनी आपल्या मोबाईलवरील स्टेटसवर संघाचे व्हिडिओ, फोटो, मिम्स ठेवले असते. सरकारने विजयी संघाला रोख पारितोषिक घोषित केले असते मात्र हीच कामगिरी महिला संघाने केली तर त्यांच्या पदरी काय येते तर उपेक्षा. त्यांच्या या कामगिरीची दखल घ्यावी असे कोणालाही वाटले नाही कारण ही कामगिरी कोणी केली तर महिलांनी. केवळ याच सामन्यात नाही तर आतापर्यंत झालेल्या सर्वच सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवला आहे. भारतीय महिलांचा हा संघ बलवान संघ आहे. फलंदाजीत भारतीय संघातील महिला फॉर्मात आहे. कर्णधार हरमनप्रित कौर, स्मृती मानधना, हर्लिन देवल, जेमिना रॉड्रिग्ज, दीप्ती शर्मा, रिचा घोष हे सर्वच फलंदाज फॉर्मात आहे. यातील दोन किंवा तीन फलंदाज जरी चालले तरी भारत हा विश्वचषक जिंकू शकेल. गोलंदाजीतही क्रांती गौड, दीप्ती शर्मा, स्नेह राणा, रेणुका या जबरदस्त फॉर्मात आहे. भारताचे क्षेत्ररक्षणही चांगले आहे एकूणच यावेळी भारतीय महिलांना विश्वचषक जिंकण्याची चांगली संधी आहे. भारतीय महिलांनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारत पहिल्यांदा ५० षटकांच्या विश्वचषकावर आपले नाव कोरू शकतो. भारतीय महिलांनी अद्याप कोणताही विश्वचषक जिंकलेला नाही. नाही म्हणायला दोन वर्षापूर्वी १९ वर्षाखालील महिलांनी पहिल्यांदा विश्वचषकावर नाव कोरले होते. कोणत्याही स्तरावरील भारतीय महिला क्रिकेट संघाचे ते पहिले विश्वविजेतेपद होते. मात्र वरिष्ठ संघाला अशी कामगिरी करता आली नाही. याआधी भारताच्या वरिष्ठ महिला संघाने एकदिवसीय व टी २० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला होता मात्र दुर्दैवाने त्या वेळी भारतीय महिलांना विश्वविजयाला गवसणी घालण्यात अपयश आले होते आता मात्र हा विश्वचषक जिंकून हे अपयश पुसायची संधी या संघाला आहे. देशातील १४५ कोटी जनतेने भारताच्या या महिलांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले तर हा संघ देखील ऐतिहासिक कामगिरी करून भारताला विश्वचषक जिंकून देईल. भारतीय महिला संघाला विश्वविजयासाठी मनापासून शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# फुलंब्री तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने मेळावा संपन्न, पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस**
**फुलंब्री / प्रतिनिधी/** कुणी काय केलं याकडे लक्ष देऊ नका, काँग्रेस हा मुळात परिवर्तनशील पक्ष आहे.येणाऱ्या तालुकाध्यक्ष संतोष मेटे, वरुन पाथ्रीकर, राहूल सोनवणे मुदसर पटेल, यांची प्रमुख उपस्थिती होती.खासदार काळे म्हणाले की, सर्व पदाधिकारी यांनी शेअर्स कमी करु नका नव्याने होत असलेल्या शेअर्स नोंदणीला मी पाठिंबा दिला आहे. काँग्रेस पक्षाचे काम खुल्या मनाने करा, येणाऱ्या निवडणुका महाविकास आहे. त्यासाठी त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याची गरज आहे. सध्या देशात मोठ्या प्रमाणात हुकुमशाही वाढली आहे.



काळात सर्व हेवेदावे विसरून कामाला लागा, असे आवाहन खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केले. रविवारी फुलंब्री तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुका मेळावा व ननिर्वाचित पदाधिकारी यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी काँग्रेस सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, जिल्हाध्यक्ष किरण पाटील डोणगावकर, जिल्हा बँकेचे संचालक जगन्नाथ काळे, जिल्हा दूध संघाचे संचालक संदीप बोरसे, सुदामा मते, युवक जिल्हाध्यक्ष विश्वास औताडे, आता संघाटत्मक बांधणीकडे लक्ष द्यावे,मेळाव्यात उपस्थितांना मार्गदर्शन करताना खासदार कल्याण काळे,देवगिरी कारखान्याची वाईट अवस्था कुणामुळे तालुक्यात पत्रकारांनी आता खरी बातमी छापावे देवगिरी कारखान्याची वाईट अवस्था कुणामुळे झाली हे छापा. तालुक्यात सर्व काही आलबेल नाही. कारखाना आतापासूनच चालू झाला की काय असे चित्र निर्माण झाले आहे. मात्र मी याबाबत खुलासा केला आहे. कारण कारखाना आपल्या मालकीचा आहे. आमचे जुने आघाडी सोबत लढवायच्याही स्वतंत्र याचा प्रत्येक जिल्हा परिषद सर्कलनिहाय, व नगरपंचायतचीही बैठक घेऊन ठरवा तो अहवाल वरिष्ठांना पाठवण्यात येईल, असे यावेळी खासदार काळे यांनी कार्यकत्यांना सूचना केल्या. यावेळी विविध पक्षातील कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.लक्ष द्यावे आगामी निवडणुकीत मोठ्या प्रमाणात विजय मिळवायचा आहे त्यासाठी आतापासूनच प्रयत्न करणे आवश्यक आहे. मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात अत्तिवृष्टी झाली शेतकरी हवालदिल झाला

# माहिती अधिकार सप्ताहानिमित्त छत्रपती संभाजीनगर येथे मार्गदर्शन कार्यक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** राज्य माहिती आयोगाचे छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर यांच्या उपस्थितीत आज राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर कार्यालयात माहिती अधिकार सप्ताहानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. माहिती अधिकार कायद्याचा नागरिकांनी सुज्ञतेने वापर करून शासनाशी संवाद साधावा, असे आवाहन माहिती आयुक्त प्रकाश इंदलकर यांनी केले.





राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर कार्यालयात ५ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत माहिती अधिकार सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात राज्य माहिती आयोगाचे उपसचिव राजाराम सरोदे, माहिती व जनसंपर्क विभागाचे सहायक संचालक गणेश फुंदे आदी उपस्थित होते.

माहिती आयुक्त इंदलकर म्हणाले, राज्य माहिती आयोगाच्या आयुक्त पदाची सुत्रे स्वीकारली त्यावेळी ८ हजार ५०० अपील अर्ज प्रलंबित होते. आज ती संख्या ६ हजार ५०० वर आली आहे. आगामी ३ महिन्यात ही संख्या ० असेल असे नियोजन करण्यात आले आहे. जनमाहिती अधिकाऱ्याने आपल्याकडे उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास विहित कालमर्यादेत देणे आवश्यक आहे. नागरिकांना योग्य माहिती मिळाल्यास शासनावरचा विश्वास दृढ होतो. त्यामुळे जनमाहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांनी नागरिकांच्या अर्जांवर गतीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

उपसचिव सरोदे यांनी माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीसंबधी आपले अनुभव सांगितले. तसेच माहिती अधिकार सप्ताहाबाबत सविस्तर माहिती दिली.पोलीस विभागाच्या वतीने पोलीस उपअधिक्षक गौतम पगारे, सह पोलीस आयुक्त श्रीमती वसुंधरा बोरगावकर, यांनी माहिती अधिकार कायद्याबाबत व कायद्याच्या अंमलबजावणीबाबत माहिती दिली.

अपिलार्थी ड.राजेश शहा, अपिलार्थीजाधव, अपिलार्थी चंद्रहार यादव, देवानंद खंदारे यांनी माहिती अधिकार कायद्याबाबत विचार व्यक्त केले.कार्यक्रमादरम्यान नागरिकांना माहिती मिळविताना येणाऱ्या अडचणी तसेच त्यावरील उपाययोजना यावर चर्चा झाली. यावेळी अधिकारी, कर्मचारी, अपिलार्थी नागरिक उपस्थित होते.

# ओला दुष्काळ जाहीर करा या सह विविध प्रश्नावर युसुफवडगाव येथे शेकापचा एक तास रस्ता रोको आंदोलन

**आत्ताच एक्सप्रेस**
**केज (प्रतिनिधी)** युसुफवडगाव येथे दि. ६/१०/२०२५ सोमवार रोजी १० वाजता शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने शिवाजी महाराज चौक येथे एक तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले, यावेळी आंदोलकांनी सरकारच्या विरोधात तीव्र घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला या वेळी बोलताना शेकापचे नेते भाई मोहन गुंड यांनी शासनाच्या नाकर्तेपणाचा पाडाच वाचला. लाडक्या बहिणी सारख्या अनेक योजना कोणी ही मागणी केली नसताना अशा योजना बळजबरीने का सरकार लोकांनवर लादत आहे. एकीकडे सरकारच्या तिजोरीत पैसे नाहीत. राज्यकर्ते बोंबबलतात आणि दुसरीकडे नको असलेला शक्तिपीठ बळजबरीने करण्याचा घाट सरकार घालत आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची १५ रुपये कापात न करता शक्तीपीठ महामार्ग रद्द करून त्याची रक्कम पूरग्रस्त शेतकऱ्यांना द्या.



**उद्योगपतीचे कर्जमाफ शेतकऱ्यांचे का नाही ! सरकार शेतकऱ्यांना उध्वस्त करून भांडवलादारीची दलाली करत आहे - भाई मोहन गुंड**

पिक विम्याचे तिन्ही ड्रेगर लागु करा. मागील वर्षी एक रुपयात पिक विमा कोणी ही मागितला नसताना तो ही आमच्या माती मारला. कोटी रुपयाचा घोटाळा सरकार मध्ये पुढारी, विमा कंपनीने मिळुन केला. अशा अनेक प्रश्नाला हात घालत भाई मोहन गुंड यांनी शासनावर सडकुन टिका केली आणि आम्हाला उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्याची वेळ येऊ देऊ नका असा इशारा दिला. या वेळी निवेदनात :- १) ओला दुष्काळ जाहीर करून, पन्नास हजार रुपये हेक्टरी मदत करा. २) पशुधन मयत झालेल्या शेतकऱ्यांना विषेश भरपाई देऊन पशुधन खरेदीसाठी कर्ज उपलब्ध करून द्या.३) अतिवृष्टीत मयत झालेल्या कुटुंबांना प्रत्येकी २० लाखाची मदत करा. कर्ज माफी करा.४) पिक विमा कंपनीने रद्द केलेला ट्रेगर पुन्हा लागु करा, तालुक्यातील मागील वर्षीचा विमा वाटप करा.५) खरीप २०२५ पिक विमा भरला त्या शेतकऱ्यांना १००% नुकसान गृहीत पिक विमा लागु करा.६) ऊस उत्पादक शेतकऱ्याचे १५ रुपये प्रतिटन प्रमाणे सरकारने वसूल न करता, शक्तीपीठ महामार्ग रद्द करून पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत करावी. या मागणीचे निवेदन महसुल अधिकारी यांना देण्यात आले यावेळी भाई रामलिंग पाटील भाई मंगेश देशमुख, भाई महेश गायकवाड, उमाकांत आप्पा भुसारी, रुपेश बोरगावकर, भाई मंगेश देशमुख, भाई महेश गायकवाड, जयराज निशिगंध, सचिन उजगरे, प्रभुलिंग निगडीकर ओमकार लामतुरे, राहुल इंगळे गणेश खानवरे, मयूर सुरवसे दीपक नांदे, दादा निकम, उत्तरेश्वर खरबड जयराज मुकदम विकास जाधव, विजय शिंदे. यासह शेतकरी उपस्थित होते पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# वृद्धत्वकालीन एकाकीपणा दूर करण्यासाठी छंद आणि सकारात्मक दृष्टिकोनाची गरज - डॉ. राजेंद्र बगाटे

**आत्ताच एक्सप्रेस**
**नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने १ ऑक्टोबर रोजी साजऱ्या होणाऱ्या 'आंतरराष्ट्रीय वृद्धत्व दिनानिमित्त' विशेष संवाद कार्यक्रम वृद्धत्व-एक सिंहावलोकन : समस्या व उपाय या विषयावर यशवाणी वेब रेडिओवर आयोजित करण्यात आला होता. मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे आणि प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या १४ व्या पुष्प परिसंवादात समाजशास्त्राचे आणि वृद्धत्वशास्त्राचे अभ्यासक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी वृद्धत्त्वाचे सामाजिक, सांस्कृतिक, मानसशास्त्रीय आणि जीवशास्त्रीय पैलू सखोलपणे मांडले.



डॉ. राजेंद्र बगाटे यांनी आपल्या संवादात सांगितले की, वृद्धत्व ही केवळ जैविक प्रक्रिया नसून जीवनातील अनुभव, ज्ञान आणि संयमाचा साठा आहे. भारताच्या संविधानानुसार ६० वर्षांवरील व्यक्ती 'ज्येष्ठ नागरिक' म्हणून ओळखल्या जातात. या काळात शरीरातील पेशींची पुनर्निर्मिती मंदावते, हाडांची व स्नायूंची ताकद घटते, आणि ज्ञानेंद्रियांची कार्यक्षमता कमी होते; पण त्याचवेळी भावनिक परिपक्वता, सहिष्णुता आणि शहाणपणा वाढतो. या गुणांचा समाजहितासाठी उपयोग झाला पाहिजे. डॉ. बगाटे पुढे म्हणाले की, वृद्धत्वाच्या काळात सामाजिक, आर्थिक आणि मानसिक आधाराची गरज सर्वाधिक असते. संयुक्त कुटुंबपद्धतीच्या ऱ्हासामुळे आणि शहरीकरणामुळे वृद्ध एकाकी पडले आहेत. त्यामुळे त्यांनी 'मी मी'च्या कवचातून बाहेर येऊन छंद जोपासावेत, समाजाशी संवाद वाढवावा, आणि सक्रिय जीवन जगावे. छंद जोपासल्याने मानसिक ताजेपणा टिकतो व आत्मसन्मान वाढतो.

डॉ. राजेंद्र बगाटे यांनी पुढे अधोरेखित केले की, रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे वृद्धांनी संतुलित आहार, नियमित विहार, आणि तणावरहित जीवनशैली स्वीकारावी. सामाजिक बदल, आर्थिक आव्हाने आणि पर्यावरणीय अस्थिरतेला सकारात्मकतेने सामोरे जाणे आवश्यक आहे. स्वावलंबन ही वृद्धांच्या आत्मसन्मानाची गुरुकिल्ली आहे. डॉ. बगाटे म्हणाले की, वृद्धांनी स्वतःची ओळख निष्क्रियतेत नव्हे तर साक्रीयतेत शोधली पाहिजे. आरोग्याविषयी जागरूकता, सामाजिक सहभाग, नव्या तंत्रज्ञानाचे ज्ञान, संवादकौशल्य आणि सतत शिकण्याची वृत्ती या गोष्टी वृद्धत्व अधिक अर्थपूर्ण करू शकतात. या संवादाद्वारे वृद्धत्वाचे समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, आर्थिक आणि सांस्कृतिक पैलू स्पष्ट करण्यात आले. वृद्धांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या सन्मानाचे आणि स्वावलंबनाचे धोरणात्मक प्रयत्न गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले. वृद्धांच्या समस्यांविषयी संवेदनशीलता निर्माण करण्याचा आणि समाजात सकारात्मक दृष्टिकोन वाढविण्याचा हा उपक्रम ठरला आहे. कार्यक्रमाचे संयोजन आणि निवेदन अध्यासन प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. त्यांनी या संवाद मालिकेचे उद्दिष्ट आणि महत्त्व स्पष्ट केले. या परिसंवादाच्या यशस्वी आयोजनात श्री. राहुल पगारे यांनी विशेष परिश्रम घेतले, तर दृक्-श्राव्य केंद्राचे प्रमुख प्रा. जदीप निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक सहाय्यक श्री. गिरीश गवळी आणि श्री. प्रकाश सापनर यांनी तांत्रिक सहकार्य केले. हा संवाद यशवाणी वेब रेडिओच्या पोर्टलवर अध्ययनार्थी व श्रोत्यांसाठी कायमस्वरूपी श्रवणासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

# जनसामान्यांना पृथ्वीविषयी सोप्या भाषेत माहिती द्या-डॉ.मिलिंद दुसाने

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** पृथ्वी या ग्रहामुळेच आपले अस्तित्व आहे. त्यामुळे त्याविषयी जनसामान्यांना माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी सर्व भूवैज्ञानिकांनी विश्वकोश नोंदीच्या माध्यमातून अधिकृत, विश्वासार्ह आणि सोप्या भाषेत माहिती उपलब्ध करुन द्यावी,असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी डॉ.मिलिंद दुसाने यांनी रविवारी येथे केले. अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ आणि दयानंद महाविद्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन संस्था, नागेश्वरवाडी येथे 'भूविज्ञान लेखकांची नोंदलेखन कार्यशाळा' रविवारी (दि.५)संपन्न झाली. विश्वकोशात भूविज्ञान विषयक नोंदींचे लेखन कसे करावे? त्यासाठी विश्वकोश लेखन, तसेच विविध विषयांची निश्चिती यासंदर्भात या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले.

**अभिजात मराठी भाषा सप्ताहः विश्वकोश मंडळातर्फे भूविज्ञान नोंद लेखन कार्यशाळा**

कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय ग्रंथकार संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजशेखर बालेकर, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य डॉ. सतीश देशपांडे, संयोजक, भूविज्ञान नोंदलेखन कार्यशाळा डॉ. पी. एस. कुलकर्णी, प्रा. डॉ. एस. के. वडगबाळकर, डॉ.मुकुंद बरिदे, डॉ. आरती बरिदे, विश्वकोश मंडळाचे विद्याव्यासंगी सहायक रवीन्द्र घोडराज आदी उपस्थित होते.

या कार्यशाळेत विश्वकोशीय लेखन प्रक्रियेत अभ्यासकांचा सहभाग वाढविणे, मराठी भाषेत विज्ञानविषयक लेखनाची दृष्टी विकसित करणे आणि भूविज्ञानासारख्या विषयातील तांत्रिक संकल्पना सुलभ भाषेत मांडणे यावर भर देण्यात आला.कार्यशाळेत प्रा. डॉ. एस. के. वडगबाळकर व मोहन मद्वाण्णा यांनी विश्वकोश नोंदीचे महत्त्व, विज्ञानविषयक कोशीय लेखन तंत्र आणि नोंदलेखनाचे विविध टप्पे यावर मार्गदर्शन केले. सहभागी अभ्यासकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रश्नोत्तर सत्रात सक्रिय सहभाग नोंदवला.



कार्यक्रमाच्या शेवटी गटचर्चा, अनुभव विनिमय व समारोप सत्र पार पडले. मार्गदर्शक म्हणून मा. डॉ. यु. डी. कुलकर्णी, प्रा. डॉ.आरती बरीदे, डॉ. सुधाकर पंडित, डॉ.पी.एल.साळवे, डॉ. अजित वर्तक आणि डॉ. अरविंद आवटी यांचे मार्गदर्शन लाभले.

कार्यशाळेस महाराष्ट्रभरातून आलेल्या भूवैज्ञानिक,भू-शास्त्राचे प्राध्यापक ,विद्यार्थी उपस्थित होते.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे विद्याव्यासंगी सहायक रवीन्द्र घोडराज यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. कैलास आहेर,डॉ.शरद गायकवाड, डॉ.संदीप सिरसाठ, डॉ. सुरेन कांबळे, योगेश वगदे,गणेश नलावडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालम वरिष्ठ भूवैज्ञानिक डॉ. कैलास आहेर यांनी तर आभार प्रदर्शन संदीप शिरसाठ यांनी केले.

## सार्वजनिक दुर्गामाता नवरात्र उत्सव : होम मिनिस्टर स्पर्धेत सोनाली राजपूत स्कूटीचे पहिले पारितोषिक

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी/** गंगापूर शहरातील जिल्हा परिषद प्रशालेच्या मैदानावर सुरू असलेल्या सार्वजनिक दुर्गामाता नवरात्र उत्सव समितीच्यावतीने रमेश परळीकर प्रस्तुत होम मिनिस्टर 'खेळ खेळूया पैठणी'चा या स्पर्धेत सौ. सोनाली मनोज राजपूत यांनी ईव्ही स्कूटर पहिले पारितोषिक पटकावले गंगापूर शहरातील हजारो महिला प्रेक्षकांच्या उपस्थितीत रमेश परळीकर यांच्या होम मिनिस्टर या स्पर्धेप्रसंगी आमदार संजनाताई जाधव, सुवर्णाताई जाधव, योगीताताई होके, कल्पनाताई बनसोड, मा. नगराध्यक्ष संजय जाधव, यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रमेश परळीकर यांनी महिला स्पर्धकांकडून उखाने, विविध गाण्यांवर नृत्य, अभिनय करवून घेउन् हास्यविनोदाने चार तास सर्वांना खिळवून ठेवले होते.



या स्पर्धेत शहरातील दीडशेपेक्षा अधिक महिला स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. उखाने, नृत्य, अभिनय यांच्या आधारे स्पर्धकांना पारितोषिके देण्यात आली.

त्यामध्ये पहिले पारितोषिक ईव्ही स्कूटर सौ. सोनाली मनोज राजपूत, दुसरे पारितोषिक वाशिंग मशिन सौ. प्रगती अजित डावकर, तिसरे बक्षिस फ्रीज सौ. अनिता अरूण मोडकर, चौथे पारितोषिक सौ. प्रतिभा पाटेकर यांनी पटकावले. याप्रसंगी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ३० महिला स्पर्धकांना पैठणी देउन गौरवण्यात आले.

याशिवाय संतोष ज्वेलर्सच्यावतीने गौरी सजावट स्पर्धेचे बक्षिसे आ. संजनाताई जाधव, योगिताताई होके पाटील, अनुराधा अंबादास दानवे, कल्पनाताई बनसोड, मंदाताई जाधव, लिना वरकड, योगीता सरकटे, अर्चनाताई सरकटे यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी शीतल नावंदर, रेखा राजपूत, संगीता वाघ, अंबिलवादे ताई, सुनीता सोळके यांच्यासह तुकाराम सटाले, संतोष अंबीलवादे, मुकुंद जोशी, सोपान देशमुख, प्रशांत काशिद आदी मान्यवर उपस्थित होते.

## बालकांच्या शैक्षणिक प्रक्रियेत अबाधित आरोग्य महत्वाचे केंद्रप्रमुख आर महाजन यांचे प्रतिपादन



**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/ प्रतिनिधी/** सिल्लोड तालुक्यातील भराडी,विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले असेल तरच तो ज्ञानप्राप्त चांगल्या प्रकारे करू शकतो म्हणून सकस आहारासह उपचार महत्वाचे असल्याचे प्रतिपादन केंद्र प्रमुख आर. महाजन यांनी केले.डॉ. ऋषिकेश काकडे प्रास्ताविकात म्हणाले की, बाल्य अवस्थेत ,विद्यार्थी दशेत फास्ट फूड, उघड्यावरील पदार्थ टाळत योग्य आहार महत्वाचा. आजाराचे कुठलेही लक्षण दिसताच किंवा सलगच्या, सातत्याच्या योग्य हालचालीत, वागण्यात बदल दिसताच हलगर्जीपणा न करता योग्य निदान करून घेणे गरजेचे. तज्ज्ञांच्या सूचनेप्रमाणे गोळ्या औषध घेणे गरजेचे असल्याचेही मत त्यांनी व्यक्त केले.भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयात छत्रपती संभाजीनगर येथील निमाई हॉस्पीटल व भराडी येथील ज्ञानाई हॉस्पिटल वतीने मोफत आरोग्य तपासणी व औषध पुरवठा करण्या करिता आरोग्य शिबिर घेण्यात आले.यावेळी बालरोग तज्ज्ञ म्हणून डॉ. भाग्यश्री इंदानी, डॉ. ऋषिकेश काकडे, शुभम सोनगिरे, दीपिका शिंदे, शिवानी नेवहारे, वैभव महाजन, कार्तिकी गव्हाणे, किरण घुले हजर होते.तर उदघाटन प्रसंगी डॉ. गजानन काकडे, रवींद्र काकडे, जगदीश साळवे, सोमनाथ काकडे, संजय काकडे, जनार्दन काकडे, राजू घुले, विलास आग्रे, कृष्णा शिंदे, दिनेश खोमणे,सुनील बसंतेसह ज्ञानविकास विद्यालयचे शिक्षकवृंद हजर होते.आलेल्या मान्यवरांचा सत्कार सन्मान विद्यालयाचे प्रमुख अशोकदादा गरुड यांनी केला.६०० पेक्षा अधिक विद्यार्थी तपासणी करून गोळ्या औषधी मोफत देण्यात आली, शाळेच्या वतीने रायभान जाधव यांनी आभार मानले.

## कारचालकाच्या धडकेत वीजखांबासह तारा जमीनदोस्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** अज्ञात कारचालकाने सोमवारी पहाटे काल्डा कॉर्नरजवळ विद्युत खांबाला धडक दिल्याने तारा तुटून पडल्या. त्यामुळे महावितरणच्या पन्नालालनगर उपकेंद्रावरील २३ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला. महावितरण अभियंते, कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम करून सायंकाळी वीजपुरवठा पूर्ववत केला.



महावितरणच्या पन्नालालनगर येथील ३३ केव्ही उपकेंद्रास चिकलठाणा येथील महापारेषणच्या १३२ केव्ही उपकेंद्रातून वीजपुरवठा होतो. सोमवारी (६ ऑक्टोबर) पहाटे ३.०५ वाजता या वाहिनीवरून येणारा वीजपुरवठा खंडित झाला. त्यानंतर १३२ केव्ही सातारा उपकेंद्रातून पर्यायी मार्गाने वीजपुरवठा सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र ही वाहिनीही बंद पडली. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी वाहिनीची पाहणी केली असता काल्डा कॉर्नर येथे एका खांबास कार धडकल्याचे दिसले. या धडकेत खांबाचे तीन तुकडे झाल्याचे तसेच या खांबावर असलेल्या चिकलठाणा व सातारा येथून येणाऱ्या दोन्ही ३३ केव्ही वाहिन्यांच्या तारा तुटून पडल्याचे आढळले.या घटनेमुळे महावितरणचे पन्नालालनगर उपकेंद्रातून निघणाऱ्या देवानगरी, चेतना, वॉटर वर्क्स, पैठणगेट, रंगमंदिर, एसबीएच व दूधडेअरी फिडरवरील पन्नालालनगर, पैठणगेट, संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा, जवाहर कॉलनी, क्रांती चौक, रेल्वे स्टेशन रोड, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पीरबाजार, श्रेयनगर, सहकारनगर, ज्योतीनगर, बालाजीनगर आदी परिसरातील २३ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला.

महावितरणच्या अभियंते, कर्मचाऱ्यांनी दुरुस्तीसाठी लगेच धाव घेतली. मात्र खांबाचे तुकडे झाल्याने नवीन खांब बसवणे, तसेच ३३ केव्हीच्या दोन वाहिन्यांच्या तुटलेल्या तारा जोडणे हे गुंतागुंतीचे व जिकिरीचे काम होते. सकाळी ८.४० वाजता देवानगरी व चेतना फीडर हे पर्यायी मार्गाने सूतगिरणी उपकेंद्रावरून सुरू करण्यात आले.मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनीही दुपारी घटनास्थळी भेट देऊन कामाबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या. गजबजलेल्या परिसरात १३ मीटर उंचीचा खांब बसवणे किचकट काम होते. त्यात वाहतुकीचे अडथळे होते. मात्र त्यावर मात करत महावितरणने सायंकाळपर्यंत काम पूर्ण केले आणि सर्व ग्राहकांचा वीजपुरवठा पूर्ववत केला. कार्यकारी अभियंता महेंद्र देशमुख, अतिरिक्त कार्यकारी अभियंता संतोष अधिकार, अनिस कुरेशी, सहायक अभियंता सचिन सोमवंशी, पल्लवी पाटील, ओमप्रकाश महाजन, सूरज मेंढे यांच्यासह महावितरण व कंत्राटदारांच्या कर्मचाऱ्यांनी यासाठी परिश्रम घेतले.दरम्यान, संबंधित कारचालकाविरोधात महावितरणतर्फे पोलिसांत तक्रार करण्याची कार्यवाही सायंकाळी उशिरापर्यंत सुरू होती.

## विश्व ब्राह्मण सेवाभावी संस्थेचा गौरवतुल्य उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/उदय कुलकर्णी/** विश्व ब्राह्मण सेवाभावी संस्था छ.संभाजीनगर या संस्थेने गेल्या अनेक वर्षांपासून एक गौरवतुल्य उपक्रम सुरु केला असुन अनेक विद्यार्थी वर्गास भरघोस शैक्षणिक निधी देऊन स्वतःचे पायावर उभे करून गरीब कुटुंबियांस हातभार लावला आहे.दि.५ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी ठीक ६: वा.छ.संभाजीनगर येथील सरस्वती विद्यालयाचे प्रांगणात गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकॅडमी मध्ये संस्थेच्या वतीने दर वर्षीप्रमाणे याही वर्षी अशाच एका भव्य - दिव्य आशा शैक्षणिक कार्याचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्षपदी नामांकित उद्योगपती श्री.विश्वनाथ जालनापूरकर यांनी भूषविले



तर प्रमुख पाहुणे म्हणून मुंबईचे प्रशिद्ध डॉ.आशिषजी पाथरीकर व ठाणे संस्थेचे श्री.सादाशिव पोंडुलकर यांनी भूषविले प्रथमता मान्यवरांचे हस्ते भगवान परशुरामाच्या प्रतिमेचे पुजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात उद्योगपती जालनाकरांनी संस्था राबवित असलेल्या या गौरवतुल्य उपक्रमास शुभेच्छा देऊन उपस्थित विद्यार्थी वर्गास पालकांस शैक्षणिक गाडा हाकलतांना विद्यार्थी वर्गाच्या कुटुंबीयांना शाळा महाविद्यालय तसेच उच्च पदविका प्रदान करण्याची इच्छा असून सुद्धा केवळ कुटुंबीयांच्या आर्थिक अडचणीमुळे अनेक विद्यार्थी वर्गास पुढच्या शैक्षणिक कार्यास मुकावे लागत होते. त्याचाच धागा पकडून या संस्थेने गेल्या अनेक वर्षापासून मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुलांना शैक्षणिक आर्थिक पाठबळ देऊन हा उपक्रम चालू केला होता.शेवटी समारोप भाषणाने व उपस्थितांच्या स्नेहभोजनाने आयोजित कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## विद्यापीठ जिल्हास्तरीय अंतर महाविद्यालयीन वैचारिक लेख स्पर्धेत शेख अरबाज मन्सुरी यांनी द्वितीय क्र,पटकवला

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील देवगाव रंगारी येथील श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, इतिहास विभाग अंतर्गत हैदराबाद मुक्ती संग्राम दिनानिमित्त विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन वैचारिक लेख स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते दरम्यान स्पर्धेचे हे १९ वे वर्ष असून यात प्रथम क्रमांक कुमारी पायल कांबळे, कला महाविद्यालय बिडकीन तर द्वितीय क्रमांक शेख अरबाज फिरोज मन्सुरी,आसारामजी भांडवलदार महाविद्यालय देवगाव रंगारी, आणि तृतीय क्रमांक (विभागून) पल्लवी जंजाळ,शिवाजी महाविद्यालय कन्नड, तृतीय क्रमांक शेख निहाकत,मौलाना आझाद महाविद्यालय,छत्रपती संभाजीनगर, प्रोत्साहनपर जोहरा अख्तर खान, वसंतराव नाईक महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर, प्रोत्साहन पर कु. कोमल हिवाळे आ.भा. महाविद्यालय देवगाव रंगारी. यावेळी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. सय्यद मुजीब, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ आघाव यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व गुलाब पुष्प देऊन यथोचित सत्कार करण्यात आले या कार्यक्रमाच्या सुरुवात संयोजक प्रा. डॉ.विनोद बोरसे यांनी हैदराबाद राज्याचा पूर्व इतिहास सांगून या स्पर्धेविषयीची रूपरेषा मांडली होती.

प्रमुख मार्गदर्शक डॉ. सय्यद यांनी या मुक्ती संग्रामातील विविध घटनांचा संदर्भसह आढावा घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कन्नडचे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक काकासाहेब



देशमुख यांचा हैदराबाद मुक्ती संग्रामातील सहभागा बद्दलचा लघुपट ही दाखवण्यात आला होता. या कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ आघाव यांनी केला. सूत्रसंचालन कु. शितल बोर्डे हिने तर आभार डॉ.मालकर सर यांनी मानले होते.

या कार्यक्रमास डॉ. उबाळे,डॉ.खुणे,डॉ. जाधव, डॉ. गोपाळ, डॉ. गोरे, डॉ. तडवी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### पंचायत समिती सभापती पद आरक्षण निश्चितीसाठी दि.१६ रोजी बैठक

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्ह्यातील पंचायत समिती सभापती पदांच्या आरक्षण निश्चितीसाठी गुरुवार दि.१६ रोजी दु.१२ वा. बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात ही बैठक होणार आहे. जिल्ह्यातील ९ पंचायत समित्यांना सध्या लागु असलेल्या आरक्षणाच्या समाप्तीनंतर लगेचच येणाऱ्या दिवसापासून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग ( विमुक्त जाती व भटक्या जमाती सह) आणि महिला (अशा जाती, जमाती आणि नागरिकांच्या मागास प्रवर्गातील) यांच्यासाठी राखुन ठेवायाच्या पंचायत समिती सभापती पदे नेमुन दिले आहे. त्यासाठी आयोजित बैठकीस राष्ट्रीय, मान्यताप्राप्त राजकीय पक्षाचे पदाधिकारी तसेच जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

### आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी बँक ऑफ महाराष्ट्रची तात्काळ कर्ज योजना

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जालना आणि संभाजीनगर जिल्ह्यात अलीकडील नैसर्गिक आपत्ती आणि पूरपरिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या तातडीच्या आर्थिक गरजांची पूर्तता करण्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे दोन वर्ष नियमित पिक कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये पर्यंत तात्काळ कृषी कर्ज योजना सुरू करण्यात आली आहे,असे जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रेषित मोघे यांनी कळविले आहे.

या योजनेद्वारे शेतकऱ्यांना पीक कर्ज, बियाणे, खत, औषधे तसेच शेतीसंबंधित इतर आवश्यक खर्चासाठी त्वरित कर्ज मिळणार आहे. पूरग्रस्त आणि आपत्तीग्रस्त भागातील शेतकऱ्यांना या योजनेचा विशेष लाभ मिळेल. पूर किंवा नैसर्गिक आपत्तीग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या अर्जांना प्राधान्य दिले जाईल. जालना आणि संभाजीनगर जिल्ह्यातील बँकेच्या सर्व ग्रामीण व अर्ध-शहरी शाखांमधून अर्ज करण्याची सुविधा. सर्व शाखांना तात्काळ कर्ज मंजुरी चे अधिकार दिले आहेत. शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधून या योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी आपल्या जवळच्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत भेट द्या,असे आवाहन जिल्हा अग्रणी व्यवस्थापक प्रेषित मोघे यांनी केले आहे.

### पैठण रस्त्यावरील रहदारीसाठी पर्यायी वाहतुक मार्ग

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५२ इ छत्रपती संभाजीनगर ते पैठण या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम सुरु असल्याने याठिकाणची रहदारी पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. दि.१८ पर्यंत ही वाहतुक याच पर्यायी मार्गाने होणार आहे.

रहदारीतील बदल याप्रमाणे-

१.कचनेर-निजलगाव-बिडकीन डीएमआयसी- निजलगाव फाटा, बिडकीन मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी वाहने कचनेर- निजलगाव- बिडकीन डीएमआयसी एन्ड्युरन्स कंपनीजवळून- शेकटा फाटा- बिडकीन मार्गे छत्रपती संभाजीनगर कडे जाईल.

२.छत्रपती संभाजीनगर- निजलगाव फाटा- बिडकीन- निजलगाव फाटा- बिडकीन डीएमआयसी- निजलगाव मार्गे कचनेरकडे जाणारी वाहने छत्रपती संभाजीनगर-निजलगाव फाटा-बिडकीन -शेकटा फाटा- एन्ड्युरन्स कंपनी जवळून- बिडकीन डीएमआयसी - निजलगाव मार्गे कचनेरकडे जातील.

३.वाळूज- शेंदुरवादा- शेकटा- शेकटा फाटा- बिडकीन- निजलगाव फाटा- बिडकीन डीएमआयसी- निजलगाव मार्गे कचनेरकडे जाणारी वाहने; वाळूज- शेंदुरवादा- शेकटा- शेकटा फाटा- एनड्युरन्स कंपनी जवळून- बिडकीन डीएमआयसी- निजलगाव मार्गे कचनेरकडे जातील.

४.कचनेर- निजलगाव-बिडकीन डीएमआयसी- निजलगाव फाटा- बिडकीन- शेकटा फाटा- शेकटा- शेंदुरवादा मार्गे वाळूज कडे जाणारी वाहने; कचनेर- निजलगाव- बिडकीन डीएमआयसी- एनड्युरन्स कंपनी जवळून- शेकटा फाटा- शेकटा- शेंदुरवादा मार्गे वाळूजकडे जातील.दि.१८ पर्यंत हे बदल लागू राहतील. प्रतिबंधीत केलेल्या मार्गावर वाहनांची ये- जा बंद करण्यात आली आहे, असे पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी कळविले आहे.

### लोकशाही दिनी ४३ अर्ज

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्हास्तरीय लोकशाही दिन आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजीत करण्यात आला. यावेळी नागरिकांकडून ४३ तक्रारी अर्ज प्राप्त झाले. विभागनिहाय प्राप्त अर्ज याप्रमाणे- जिल्हा परिषद- २, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख-१, महसूल विभाग-४, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था-१, प्रादेशिक आयुक्त सामाजिक न्याय-१, अन्य निवेदने-३४. असे एकूण ४३ अर्ज प्राप्त झाले असे सामान्य शाखेच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती संगिता राठोड यांनी कळविले आहे.

## हंबर्डा मोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा -अंबादास दानवे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मराठवाड्यातील अतिवृष्टीने बाधीत शेतकर्यांना मदतीची मागणीसाठी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयावर हंबरडा मोर्चा काढण्यात येणार




असून या मोर्चात हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केले आहे.मागील अनेक दिवसात मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात प्रचंड मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. त्यामुळे मराठवाड्यातील शेतकरी अत्यंत हातबल झाला आहे. अशा प्रचंड बिकट परिस्थितीत शासनाच्या वतीने केवळ पाहणी दौरे आयोजित करण्यात येत असून आजपर्यंत शेतकर्याला प्रत्यक्ष कवडीचीही मदत झालेली नाही. या अतिवृष्टीग्रस्त शेतकर्यांना शासनाकडून प्रती हेक्टरी ५० हजार रुपये मदत मिळावी, शेतकर्यांना सरसकट कर्जमुक्त करावे.आपत्तीग्रस्त भागातील पशुधन व पडलेली घरे यांनाही मदत करावी या मागण्या करिता मराठवाड्यातील शेतकरी रस्त्यावर उतरून छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयावर हंबरडा मोर्चा काढण्यात येणार आहे.या मोर्चाचे नेतृत्व शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे करणार आहेत.

# शेतकऱ्यांना महाविस्तार एआय ठरणार माहितीदूत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** शेतकऱ्यांना हवामान बदल बाजारपेठेतील अस्थिरता, आणि माहितीच्या अभावामुळे अनेक आव्हांनांचा सामना करावा लागतो. यावर उपाय म्हणून महाविस्तार ए.आय. हे अँप तयार केले आहे. हे कृषी विभागाने विकसित केलेले एक अत्याधुनिक प आहे. कृत्रिम बुद्धिमतेच्या सहाय्याने हे अँप शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीशी संबंधित सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी एकाच ठिकाणी माहिती उपलब्ध करून देते. मराठी भाषेत उपलब्ध असलेले हे अँप शेतकऱ्यांना रिअल टाइम माहिती, तज्ज्ञांचा सल्ला आणि आधुनिक शेती पध्दतींचे मार्गदर्शन करते. तरी शेतकऱ्यांनी या ॲपचा जास्तीत जास्त वापर करून डिजीटल शेतीकडे वाटचाल करावी आणि आपली शेती अधिक नफा देणारी बनवावी.शेतकऱ्यांनी गुगल प्ले स्टोअरवर जाऊन आजच महाविस्तार एआय प डाउनलोड करुन शेतीच्या डिजीटल क्रांतीचा भाग व्हावे. महाविस्तार एआय अँपमधील एआय चॅटबॉट शेतकऱ्यांच्या प्रश्नांना त्वरित उत्तरे देते. रिअल-टाइम हवामान अंदाज, स्थानिक पातळीवरील हवामान अंदाजामुळे शेतकरी पेरणी, कापणी आणि खतांचा वापर यांचे नियोजन करू शकतात. स्थानिक आणि राष्ट्रीय बाजारपेठेतील पिकांचे भाव रिअल-टाइममध्ये दाखवते. कृषि विभागाच्या विविध कृषी योजनांची माहिती, अनुदान, आणि विमा योजनांचे तपशील एकाच ठिकाणी मिळू शकतील. पमध्ये मराठीत व्हिडीओ उपलब्ध आहेत. ज्यात पिकांची लागवड, खतांचा वापर, कापणी, आणि जैविक शेती याबाबत तपशीलवार मार्गदर्शन मिळेल. अँपमधील एआय तंत्रज्ञानामध्ये शेतकरी पिकांचे फोटो अपलोड करून पिकांवरील रोग आणि किडींचे निदान करुन उपाय मिळवू शकतात.

महाविस्तार एआय प शेतकऱ्यांचे जीवन सुसह्य बनवण्यासाठी अनेक फायदे घेऊन आले आहेत. चुकीच्या खतांचा किंवा किटकनाशकांचा वापर टाळून शेतकरी उत्पादन खर्च कमी करू शकतात. बाजारभाव माहिती आणि हवामान अंदाजामुळे शेतकरी योग्यवेळी पिकांची विक्री आणि नियोजन करू शकतात. यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. असेही कृषी विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### ८ ऑक्टोबरला शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये अल्पमुदतीच्या ७ अभ्यासक्रमाचे उदघाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना येथील हुतात्मा जनार्धन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये अल्पमुदतीचे ७ अभ्यासक्रम दि.८ ऑक्टोबर २०२५ पासून सुरु होत आहेत. या कार्यक्रमाचा ऑनलाईन उदघाटन समारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शुभ हस्ते तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत दि.८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता मुंबई येथे होणार आहे.जालना येथील आयटीआयमध्ये ब्युटी थेरिपिस्ट, टेक्निशियन एअर कंडीशनर, सोलर पॅनल इन्स्टॉलेंशन टेक्निशियन, ड्रोन सर्व्हिस टेक्निशियन, मोबाईल रिपेअरिंग, एलईडी लाईट रिपेअरिंग, डिजीटल मित्र हे अल्पमुदतीचे अभ्यासक्रम सुरु होत आहेत. अभ्यासक्रमासाठी इयत्ता आठवी, दहावी, आयटीआय उत्तीर्ण ही अर्हता ठेवण्यात आली आहे. असे उपप्राचार्य, हुतात्मा जनार्धन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### धनगर समाजाला एसटी प्रवर्गात समाविष्ट करा !-हेमंत पाटील यांची मागणी

आत्ताच एक्सप्रेस

पुणे/प्रतिनिधी/धनगर समाजाला अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करण्याची दीर्घकालीन मागणीने पुन्हा एकदा जोर धरला आहे. इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांनी या संदर्भात राज्य सरकारकडे मागणी केली आहे. 'धनगर' आणि 'धनगड' एकच असून केवळ नोंदणीतील चुकांमुळे धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या लाभांपासून दूर ठेवले जात आहे. ही अन्यायकारक परिस्थिती तातडीने दुरुस्त करण्याचे आवाहन पाटील यांनी केले आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे संवेदनशील असून मराठा समाजासाठी जसे त्यांनी सकारात्मक पावले उचलली, तसेच आता धनगर समाजासाठीही ते निश्चितच योग्य निर्णय घेतील, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.राज्याच्या सामाजिक न्याय विभागाच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात धनगर समाजाची लोकसंख्या सुमारे ८% आहे. समाजातील साक्षरतेचा दर ६५% असून, तो राज्याच्या सरासरी साक्षरतेपेक्षा (८४%) खालचा आहे. बेरोजगारीचे प्रमाणही धनगर समाजात लक्षणीय असून, सुमारे ४२% युवक रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत.मागील दहा वर्षांत या समाजातील केवळ २.७% विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत, ही आकडेवारी धनगर समाजातील मागासलेपणा दर्शवते.राज्यातील अनेक भागांमध्ये धनगर समाज हा पशुपालन, शेती व पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून असून, त्यांचे सामाजिक व आर्थिक स्तर अद्यापही मागासलेले आहे. अनुसूचित जमातींमध्ये समावेश झाल्यास या समाजाला शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेले आरक्षण आणि अन्य सवलती मिळू शकतील. धनगड नावाने अनुसूचित जमातीत नोंद असलेल्या जमातीशीच धनगर समाजाचा मूळ संबंध आहे. पण इंग्रजीत व भारतीय जनगणनेत नावाची चूक झाल्याने आजपर्यंत धनगर समाजाला अनुसूचित जमातीचा लाभ मिळालेला नाही, अशी खंत पाटील यांनी व्यक्त केली.केंद्र सरकारकडे २०१४ पासून या मुद्द्यावर अहवाल, शिफारसी आणि प्रस्ताव सादर झालेले आहेत, परंतु अद्याप अंतिम निर्णय प्रतीक्षेत आहे. राज्य सरकारने मागील काळात धनगर समाजाच्या एसटीमध्ये समावेशासाठी केंद्र सरकारकडे शिफारस पाठवली होती.मात्र, केंद्र सरकारने या संदर्भात आणखी अभ्यास व पुरावे मागितले आहेत. या प्रक्रियेमुळे निर्णय लांबणीवर पडत असून, समाजात नाराजीचा सूर आहे. धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश हा केवळ सामाजिक न्यायाचा नाही तर ऐतिहासिक चुका दुरुस्त करण्याचा प्रश्न आहे, असे मत पाटील यांनी व्यक्त केले.

# सेपाक टाकरा खेळ जालना जिल्ह्याच्या गावांगावात पोहोचवीणार - मंगलाताई पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना व जिल्हा क्रीडा परिषद जालना यांच्या वतीने तसेच जिल्हा सेपाक टाकरा असोसिएशन, जालना यांच्या तांत्रीक सहकार्याने आयोजीत जिल्हास्तर शालेय सेपाक टाकरा क्रीडा स्पर्धा २०२५ - २६ जिल्हा क्रीडा संकुल जालना याठिकाणी उत्साहात संपन्न झाल्या.स्पर्धेच्या उद्घाटीका म्हणुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या महिला जिल्हाध्यक्षा श्रीमती मंगलाताई पाटील यांची उपस्थिती होती, आपल्या उद्घाटनपर भाषणात श्रीमती पाटील बोलत होत्या, पुढे बोलतांना त्या म्हणाल्या की, सेपाक टाकरा हा अत्यंत चांगला क्रीडा प्रकार असुन जालना जिल्ह्यामध्ये या खेळाचा म्हणावा तसा प्रसार व प्रसार झालेला नाही.

परंतु आपण जातीने या खेळात लक्ष घालुन जालना जिल्ह्यातील प्रत्येक गावांमध्ये या खेळाचे खेळाडु निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत, केवळ खेळाडु निर्माण करून थांबणार नाही तर पक्ष प्रमुख अजित दादा पवार, प्रदेश अध्यक्षा रूपालीताई चाकणकर, जालना जिल्हा अध्यक्ष अरविंद अण्णा चव्हाण व पक्ष निरीक्षक श्रीमती वैद्य ताई यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने जालना जिल्ह्याचे खेळाडु राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत पोहोचवीण्याचे काम आपण करणार आहोत असे ही त्यांनी यावेळी जाहिर केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन रेल्वे युनीयनचे सचिव शेख जावेद, सेपाक टाकरा असोसिएशनचे संस्थापक सचिव शेख चाँद पी.जे., असोएिशनच्या पदाधिकारी श्रीमती शेख महेजबीन, क्रीडा अधिकारी श्रीमती लता लोंढे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रमुख पाहुणे शेख जावेद यांनीही खेळाडुंना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत जालना, परतुर, मंठा, घनसावंगी या तालुक्यातुन मुलांमुलींच्या तिस संघानी सहभाग नोंदवीला. स्पर्धेत पंच म्हणुन अमोल काटकर, संतोष वाघ, शेख समीर, सोहेल खान, संकेत रोजेकर आदिंनी काम पाहीले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी लांडगे सर,



उमेशचंद्र खंदारकर, मोहम्मद यासीन, अमोल सोलाट, जाधव सर, घोष सर, शुभम पवार, रियाज सर, योगीता मॅडम, गायकवाड मॅडम आदिंनी सहकार्य केले. स्पर्धेचा अंतीम निकाल पुढील प्रमाणे आहे.

१४ वर्षाआतील मुले - प्रथम - ऋषी विद्या एजुकेशनल स्कुल, जालना, द्वितीय - जिल्हा परीषद प्रशाला, नेर ता. जि. जालना. १४ वर्षाआतील मुली - प्रथम - जिल्हा परिषद प्राथमीक शाळा, चापडगाव ता. घनसावंगी, द्वितीय - लेट श्री लालचंदजी सकलेचा मेमोरियल इंग्लीश स्कुल, जालना. १७ वर्षाआतील मुले - प्रथम - ऋषी विद्या एजुकेशनल स्कुल, जालना द्वितीय - एम.आर. डी.ए. स्कुल जालना. १७ वर्षाआतील मुली - प्रथम - ऋषी विद्या एजुकेशनल स्कुल, जालना द्वितीय - लेट श्री लालचंदजी सकलेचा मेमोरियल इंग्लीश स्कुल, जालना.

१९ वर्षाआतील मुले - प्रथम - ऋषी विद्या एजुकेशनल स्कुल, जालना द्वितीय - जिल्हा परीषद प्रशाला, नेर ता.जि. जालना. १९ वर्षाआतील मुली - प्रथम - लेट श्री लालचंदजी सकलेचा मेमोरियल इंग्लीश स्कुल, जालना.

## रमाईच्या भावूक क्षणाने प्रेक्षकांचे डोळे पाणावले मी रमाईएकपात्री प्रयोग आष्टीत हाऊसफुल्ल

**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी (प्रतिनिधी)** माता रमाईचा खडतर जिवन प्रवास,जीवनातील संघर्ष, संकटाचा सामना करण्याची जिद्द, आणि परिस्थितीशी लढण्याचे धाडस असे सर्व प्रसंग रंगमंचावर अधोरेखित करून माता रमाईने आपल्या मुलांच्या मृत्यू प्रसंगी केलेला आक्रोश पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यात पाणी तरळले, मी रमाई या एकपात्री नाटकातून दाखविण्यात आले आष्टीत या प्रयोगास समाज बांधवांनी भरभरून प्रतिसाद दिला.याविषयी सविस्तर वृत्त असे की,आष्टी ता परतूर येथील मोरंगेश्वर मंगल कार्यालात बुद्धभूमी चॅरिटेबल ट्रस्ट प्रकाश वाघ निर्मित 'मी रमाई' एकपात्री नाटकाचे आयोजन करण्यात आले होते माता रमाबाई आंबेडकरांच्या



धाडसी जीवनावर आधारित असलेले भारतातील पहिले आणि एकमेव नाटक मानले जाते, रमाबाईंचा रडणारा नव्हे, तर परिस्थितीशी दोन हात करत लढणारा जिवन प्रवास लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न नाटकातून करण्यात आलेला असुन पंचवीस हून अधिक राष्ट्रीय आंतर राष्ट्रीय दर्जाचे पुरस्कार प्राप्त कला दिग्दर्शक व चित्रकार देवदास भंडारे हे ही याप्रसंगी उपस्थित होते नाटकाच्या माध्यमातून सद-रील नाटकाचे दिग्दर्शक रमाकांत भालेराव व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त अनेक मराठी हिंदी सिनेमा व मालिका मध्ये काम करणाऱ्या प्रसिद्ध सिनेअभिनेत्री प्रियांका उबाळे यांच्या माध्यमातून करत असून या नाटकास महाराष्ट्र भर प्रेक्षकांनी प्रचंड दाद मिळाली आहे डोळ्यासमोर जणु काही जिवंत माता रमाई समोर आहे अशा भूमिकेत प्रियांका उबाळे (वाघ) दिसत होत्या, रमाई च्या जिवनात आलेल्या प्रसंगातून अनेक वेळा प्रेक्षकांचे डोळे पाणावले, कार्यक्रमास उत्सुर्फ प्रतिसाद मिळाला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीचे आष्टीचे सरपंच मधुकर मोरे, गोळेगावचे सरपंच उद्धव डोळस, रोहन वाघमारे, गौतम शेळके, शिवाजी डोळस, राजेश नायक, यांनी अहोरात्र मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

## सर्मपित स्वयंसेवक घडवणे संघाच ध्येय -प्रशांत कुलकर्णी

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतुर/ प्रतिनिधी/** या राष्ट्रावर आलेल्या प्रत्येक आपतीवर व समस्यावर सर्मपणभावाने धावुन जाणारा स्वयंसेवक तयार करणे संघाच काम आहे असे प्रतिपादन प्रशांत कुलकर्णी यांनी केले ते रा.स्व.संघाच्या विजयादशमी उत्सवात बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, रा.स्व. संघावर गेल्या १०० वर्षात अनेक टिका सहन कराव्या लागल्या परंतु या राष्ट्राला परम वैभवाला नेण्याचे ध्येय समोर ठेवुन डॉ. हेडगेवार यांनी संघाची स्थापना केली.डॉ. हेडगेवार स्वतः स्वातंत्र्य संग्रामात अग्रणी होते कलकत्ता मधील क्रांतिकारी गटाचे ते सदस्य होते.स्वातंत्र्यनंतर हिंदुची काय अवस्था होईल असा दुरगामी विचार करुन संघाची स्थापना केली.

संघाच्या माध्यमातून अनेक सेवा प्रकल्प चालवले जातात आणि याच सेवाकार्याच्या आधारावर संघ शताब्दी वर्ष पुर्ण करत आहे.येणाऱ्या काळात स्वयसेवकांना विविध अभियान रावबुन संघाचे पुढे न्यायचे आहे आणि राष्ट्रला परम वैभवत्व प्राप्त करुन



देण्याचा जबाबदारी स्वयंसेवकाची आहे.

प्रमुख पाहुणे डॉ.गोपीकिशनजी बांगड यांनी Rss म्हणजे राष्ट्र,सेवा आणि स्नेह राष्ट्राची सेवा करत जनतेच स्नेह प्राप्त करुन संघ शताब्दी साजरी करत असल्याचे त्यांनी सांगितले.प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी संघाचा विजयदशमी उत्सव थाटात साजरा करण्यात आला.४०० गणवेषधारी स्वयंसेवकाच्या शिस्तबद्ध संचलनाव्दारे शहराचे वातावरण संघमय झाले होते.

संचलन मार्गावर मातृशक्तीव्दारा रांगोळी काढुन व पुष्पवृष्टी करुन स्वागत करण्यात आले.व्यासपीठावर प्रमुख वक्ते प्रशांत कुलकर्णी,डॉ.गोपीकिशनजी बांगड व परतुर तालुका संघचालक डॉ.प्रमोद आकात उपस्थित होते.

### १३ ऑक्टोबरला पंचायत समिती सभापती पदासाठी आरक्षण सोडत

**आत्ताच एक्सप्रेस/ जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यातील आठ पंचायत समित्यामधील राखीव ठेवावयाच्या सभापती पदासाठी आरक्षण सोडत दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात काढण्यात येणार आहे. अनुसूचित जाती-१ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्ग- १ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला- १ जागा, सर्वसाधारण-२ जागा, आणि सर्वसाधारण महिला -३ जागा राखीव आहेत. तरी पंचायत समिती सभापती आरक्षण सोडतीसाठी सर्व ग्रामस्थांनी हजर रहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# रामेश्वर महाविद्यालयाचा हॉलिबॉल संघ जिल्ह्यात प्रथम

**आत्ताच एक्सप्रेस /**

**सोयगाव / प्रतिनिधी /** येथील श्री रामेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचा व्हॉलीबॉल संघ जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये विजेता ठरला असून आता तो राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. जालना येथील खरपूडी येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय हॉलिबॉल स्पर्धेत जालना येथील टीमला नमवीत रामेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या टीमने प्रथम क्रमांक मिळवीत विजेतेपद पटकावीले. या यशस्वी खेळाडूं, प्रशिक्षक अकबर पठाण (बबलू) व क्रीडाशिक्षक कच्छवाह सर यांचा श्री रामेश्वर शिक्षण संस्थेचे केशव पाटील जंजाळ, नंदकुमार गिऱ्हे, प्रशासकीय अधिकारी प्राचार्य पी.जी. वाघ प्राचार्य विष्णु शेळके, केंद्रप्रमुख सोनवणे शिक्षक तालुका क्रीडा मार्गदर्शक कृष्णा पा. जंजाळ, माजी प्राचार्य एस. एफ. इंगळे यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या प्रांगणात यथोचित सत्कार करण्यात आला या प्रसंगी प्रा. राम भांदरगे प्रा. देविदास राठोड प्रा.



संजय आंधळे प्रा. विजय वाकेकर, प्रा.रमेश गावंडे प्रा.समाधान जंजाळ प्रा. काटोले,प्रा. पंडित प्रा. साळवे, प्रा. कच्छवाह, प्रा. कांबळे प्रा. भोंडे प्रा. नाईक श्रीमती तोटलवार,प्रा. ठोंबरे प्रा. बोरसे, सुभाष ब्राह्मणे यांच्यासह इतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247

The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813